# अभ्युदय नगर
## सहकारी गृहनिर्माण संस्थांचा संघ (मर्या.)

(नोंदणी क्रमांक : एमयुएम/एमएचएडीबा/एचएसजी/टीसी)१२४९२/सन २००६–२००७)

कार्यालय : समाज मंदीर हॉल, वीर श्रीकांत हडकर मार्ग, अभ्युदयनगर, काळाचौकी, मुंबई – ४०० ०३३.

---

जा. क्र. : ०७/२०१६-१७ 　　　　　　　　　　　　　　　　　　　　　　　　　दिनांक : ०७/०७/२०१६

प्रति,
**मा. अध्यक्ष / सचिव,**
अभ्युदयनगर ______________ सहकारी गृहनिर्माण संस्था (मर्या.),
इमारत क्र. ........

**विषय : <u>अभ्युदयनगर म्हाडा वसाहतीच्या एकत्रित पुनर्विकासाची विकासकांनी दिलेली देकार ऑफरची मुदत ९० दिवसांनी विस्तारीत करण्यात आली असल्याबाबत....</u>**

**महोदय,**

अभ्युदयनगर म्हाडा वसाहतीच्या एकत्रित पुनर्विकासाकरिता प्राप्त झालेल्या निविदा भरणा केलेल्या अंतिम चार विकासकांच्या निविदेची देय ऑफर १८० दिवस याप्रमाणे दोन वेळा विस्तारीत करण्यात आली होती. मात्र या मुदतीमध्येसुद्धा आजवर एकूण ४७ सभासद संस्थांपैकी ३० संस्थांनी त्यांच्या संस्था स्तरावर निविदा प्रक्रिया पुर्णत्वास नेऊन अंतिम विकासकाची निवड केलेली आहे. उर्वरित १७ संस्थांपैकी ५ संस्थांनी आपले प्रस्ताव उपनिबंधक कार्यालय यांच्याकडे विकासक निवडीच्या सभेकरीता प्राधिकृत अधिकारी नेमणूकीकरिता सादर केलेले आहेत. अशा प्राप्त परिस्थितीत या उर्वरित संस्थांना ही निविदा प्रक्रिया पुर्णत्वास नेऊन अंतिम विकासक निवड करण्याकरीता ही संपुष्टात येणाऱ्या निविदा देय ऑफरची मुदत पुन्हा ९० दिवसांच्या कालावधीकरीता विस्तारित करण्यात आलेली आहे.

निविदेतील नमूद अधिकारानुसार व विधी सल्लागार यांच्या मार्गदर्शनानुसार निविदा देय ऑफरची मुदत आजपासून ९० दिवसांनी विस्तारीत करण्यात आल्याचे या पत्राद्वारे आम्ही कळवित आहोत. तरी सदर कालावधीत आपण आपल्या संस्था स्तरावर विकासक निवडीची प्रक्रिया पूर्णत्वास न्यावी ही नम्र विनंती.

**धन्यवाद...!**

**आपले नम्र,**

**( जयसिंग भोसले )**
**सरचिटणीस**
**अभ्युदयनगर सह.गृह.संस्थांच्या संघावतीने**

अभ्युदय नगर
सहकारी गृहनिर्माण संस्थांचा संघ (मर्या.)
(नोंदणी क्रमांक : एमयुएम/एमएचएडीबा/एचएसजी/टीसी)१२४९२/सन २००६–२००७)
कार्यालय : समाज मंदीर हॉल, वीर श्रीकांत हडकर मार्ग, अभ्युदयनगर, काळाचौकी, मुंबई – ४०० ०३३.

जा. क्र. : दिनांक :

# अभ्युदयनगर सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या संघाची सन २०१५-१६ ते २०२०-२१ करीता कार्यकारी मंडळ जाहीर

महोदय,

अभ्युदयनगर सहकारी गृहनिर्माण संस्थांचा संघ मर्या. यांच्या सन २०१५-१६ ते २०२०-२१ या पंचवार्षिक कालावधीकरीता दिनांक २७ मार्च २०१६ रोजी झालेल्या व्यवस्थापन समितीच्या निवडणूकीत निवडून आलेल्या व बिनविरोध निवडून आलेल्या उमेदवारांमधून प्राधिकृत अधिकारी / निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या उपस्थितीत संघाचे पदाधिकारी यांची निवड करण्यात आली.

## नविन कार्यकारी मंडळ

श्री. नंदकुमार मानसिंग काटकर - अध्यक्ष
श्री. विलास श्रीपत सावंत - उपाध्यक्ष
श्री. जयसिंग शिवराम भोसले - सरचिटणीस
श्री. अनिल आत्माराम नाईक - खजिनदार
श्री. अनंत रामचंद्र केळुसकर - सहसचिव
श्री. भरत एकनाथ वीर - सहसचिव

## सदस्य

श्री. स्टॅन्ली एडवर्ड बेंजामिन पालन्ना
श्री. केतन जनार्दन चव्हाण
श्री. नंदकुमार गोपीनाथ चव्हाण
श्री. प्रभुकुमार के. नाथ
श्री. दत्तात्रय गंगाराम आमडोस्कर
श्री. धोंडीराम अर्जुन बोडके
श्री. भरत यशवंत कारंडे
सौ. वैशाली सुरेश शहाणे

**या निवडणुकीत आम्हांला निवडून देऊन आमच्यावर दाखविलेल्या विश्वासाबद्दल सदर कार्यकारी मंडळातर्फे सर्व सभासद संस्था रहिवाशांचे आम्ही आभारी आहोत. आपल्या सर्वांना गुढीपाडव्याच्या हार्दिक शुभेच्छा..!**